


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७९४ वा | गुरुवार | दि. ०६ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# जिल्हा सामान्य रुग्णालयात उघडपणे होतेय अवैध बांधकाम

# नॅशनल हेल्थ मिशन अधिकाऱ्यांचे कानावर हात, कंत्राटदाराची मनमानी

**पोस्टमार्टम १७**

## भ्रष्टाचारी कुठेही असो दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज उघडे पाडणार

**मागील काळात जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या या भ्रष्टाचार व अनागोंदी बाबत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असलेल्या मनमानीबाबत दैनिक जनसंचलन आगामी काळात देखील सातत्यानेआवाज उठवत राहणार आहे. याशिवाय जिल्हा रुग्णालयात जे काही निकृष्ट तसेच अवैध बांधकाम केले जात आहे, त्याबाबतही भंडाफोड करण्याचे काम दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत राहणार आहे. भ्रष्टाचारी कुठेही असो जिल्हा रुग्णालयात की सार्वजनिक ाबंधकाम विभागात परंतु त्यांचे चेहरे जगासमोर आणण्याचे काम आम्ही सातत्याने करीत राहणार आहोत.नॅशनल हेल्थ मिशन अंतर्गत सुरू असलेल्या नियमबाह्य करोडो रूपये बांधकामाचा छडा आम्ही लावू**




**जनसंचलन/बुलढाणा**

तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यकाळातील विविध प्रकारचे भ्रष्टाचार आणि अनागोंदीसाठी प्रसिद्ध असलेल्या जिल्हा रुग्णालयातून दररोज नवनवीन प्रकार समोर येत आहेत. भ्रष्टाचाराने एकीकडे कळस गाठलेला असताना आणि कामकाजाचा खेळखंडोबा झालेला असताना आता जिल्हा सामान्य रुग्णालयात नॅशनल हेल्थ मिशन अंतर्गत सुरू असलेल्या प्रचंड अशा नियमबाह्य बांधकामाचे प्रकरण समोर आलेले आहे. या प्रकारामुळे पुन्हा एकदा हे सिद्ध झाले आहे की, जिल्ह्यातील आरोग्य प्रशासन पूर्णपणे हवेवर असून, त्या ठिकाणी कोणाचा पायपोस कोणात दिसून येत नाही. मागील काळापासून भ्रष्टाचार अनागोंदीचा जिल्हा रुग्णालयात बोलबाला बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात कामकाजाचा जो काही बोजवारा उडालेला आहे, त्यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन तर सातत्याने आपल्या वृत्तमालिकेतून प्रहार करीतच आहे. मात्र, जिल्हा आरोग्य विभाग व रुग्णालयाचे कामकाज एव्हढे ढिसाळ झाले आहे आणि प्रशासन एव्हढे निगरगट्ट झालेले आहे की, त्या ठिकाणी कोणतीही सुधारणा दिसून येत नाही. दररोज काही ना काही तत्कालीन बहुचर्चित जिल्हा शल्य चिकित्सक व बहुचर्चित भांडारपालाच्या भानगडी समोर आल्याशिवाय जिल्हा रुग्णालयाचा विषयच पूर्ण होत नाही. जिल्हा रुग्णालयात मागील काळात झालेल्या अनेक गैरप्रकारांचे माहिती देणे सद्या स्थित असलेले जिल्हा शल्य चिकित्सक सुभाष चव्हाण यांच्यावर येऊन ठेपलेली आहे. भ्रष्टाचाराची शृंखला तर जिल्हा रुग्णालयात काही ठिकाणी पावलोपावली दिसून येत आहे. सर्वसामान्य नागरिकांना सुविधा देखील योग्य मिळत नाही. जिल्हा रुग्णालयात असलेल्या साहित्य, औषधी-उपकरणांविषयी करोडो रुपये भ्रष्टाचार माहिती कागदावर वेगळी असते, तर प्रत्यक्षात वेगळीच असते. या ठिकाणी जे डॉक्टर कागदावर कार्यरत असतात, त्यातील काही प्रत्यक्षात दुसऱ्या ठिकाणी कार्यरत असतात. अवैध व निकृष्ट बांधकाम अन् ढिसाळ आरोग्य प्रशासन या संपूर्ण स्थितीत आता येथे एक नवीनच प्रकरण समोर आलेले आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या काही महिन्यांपासून नॅशनल हेल्थ मिशन अंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून एका इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे. ही इमारत बांधताना कंत्राटदाराकडून नियमांचा सर्रासपणे भंग होत आहे. कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी जिल्हा रुग्णालयात काही ठिकाणी तोडफोड जुनी इमारत जमीनदोस्त केली आहे. त्या ठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामावर ही प्रश्न उभे झाले आहे. आरोग्य प्रशासनाला माहिती नाही. जिल्हा शल्यचिकित्सकांना या बांधकामासंदर्भात विचारणा केली असता, त्यांनी कानावर हात ठेवले. नॅशनल हेल्थ मिशन अधिकारी व कंत्राटदाराकडे यासंदर्भात विचारणा केली असता, त्याच्याक़डून उडवा-उडवीची उत्तरे दिली जात आहेत. कंत्राटदार तर एव्हढा बेजवाबदार झालेला आहे की, तो या ठिकाणी बांधकाम करताना जो काही नियमभंग करीत आहे, त्यासंदर्भात त्याला कशाचीही फिकर नाही. या कंत्राटदारावर राजकीय वरदहस्त असल्याची चर्चा रुग्णालय परिसरात दिसून येते. नॅशनल हेल्थ मिशन विभागाच्या अधिकाऱ्यांचे व कंत्रातदाराचे अर्थपूर्ण साटेलोटे झालेले असल्याचेही बोलले जात आहे. यावरून हे दिसते की, या भ्रष्टाचार व अनागोंदीच्या धबडग्यात बाहेर जिल्ह्यातील खासगी कंत्राटदाराने हे काम मिळविले आहे. कारण जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात होत असलेले हे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याची खात्रिलायक माहिती आहे. भविष्यात जेंव्हा ही इमारत तयार होऊन कामकाजात येईल, तेंव्हा या निकृष्ट बांधकामाचा फटका रुग्णालयाचे अधिकारी, कर्मचारी किंवा सामान्य नागरिकांना बसू शकतो. आरोग्य विभागालाही भ्रष्टाचार अनागोंदीची लागण जिल्हा सामान्य रुग्णालयाविषयी काहीही काम करायचे असेल, तर पिडब्ल्यू विभागाकडे आधी ते काम जाते. सार्वजनिक बांधकाम विभागाचेही अनेक अधिकारी हे भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत मस्तपैकी लोळत आहेत. जिल्हा रुग्णालयासारखी ढिसाळपणाची व भ्रष्टाचाराची लागण पिडब्ल्यू व इतर विभागाला देखील झाली आहे. या अनागोंदीमुळे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे प्रशासन नॅशनल हेल्थ मिशन विभागाचे प्रशासन यांच्यात कोणताही ताळमेळ दिसून येत नाही. या संपूर्ण प्रकारामुळे अनागोंदीमध्ये आणखीनच भर पडली आहे. हे सगळे प्रकार पाहिले की, सध्याच्या स्थितीत जिल्हा सामान्य रुग्णालय हे भल्या मोठ्या विनोदाचे केंद्र बनल्याचे दिसत आहे. या ठिकाणी कार्यरत जबाबदार अधिकारी हे बेजबाबदारपणाचा कळस गाठत आहेत. या अधिकाऱ्यांना केवळ स्वतःचे खिसे गरम करण्याची चिंता असते. त्यांना कामकाज कशाप्रकारे चाललेले आहे, याची काहीही चिंता राहत नाही.

अजून बरेच काही पुढील भागात

## वीज तारेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू


**जनसंचलन/बीबी**

लोणार तालुक्यातील मांडवा येथील फरान खॉ सुभान खॉ पठाण यांचा ५ जून रोजी दुपारी वाजण्याच्या दीड सुमारास खाली लोंबकळलेल्या विद्युत तारेचा शॉक लागून मृत्यू झाला. मांडवा शिवारातील गट नंबर ३१९ मध्ये असलेल्या प्रकाश आसाराम वाघ यांच्या शेतशिवारात ही घटना घडली.पेरणीचे दिवस जवळ आल्याने शेतीच्या मशागतीला सुरुवात झाली आहे. फरान खॉ पठाण यांनी आपल्या शेताच्या शेजारी असलेल्या प्रकाश आसाराम वाघ यांच्या बैलगाडीत शेतात वखर पाळी घालण्यासाठी घरून वखर घेतला होता. बैलगाडी प्रकाश वाघ यांच्या गोठ्याजवळ उभी केली आणि गाडीतून वखर खाली उतरत असताना, फरान यांनी वखर खांद्यावर घेतला, तेव्हा वखराच्या लोखंडी दांडीचा खाली लोंबकळलेल्या विद्युत तारेला स्पर्श झाल्याने त्यांना शॉक लागला. खरे तर एलेव्हन केवीची तार ही जमिनीपासून वीस फूट उंच असायला पाहिजे, परंतु ती कमी उंचवीर होती. दरम्यान फरानला दुचाकीवर बिबी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

## केळवद येथे सर्वजातीय विवाह सोहळा

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील केळवद येथील संजीवनी बहुउदेशीय शिक्षण प्रसारक संस्था, समाजकल्याण व महिला बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आज गुरुवार ६ जून रोजी केळवद येथील कार्यालयासमोर सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याचे उदघाटन आमदार श्वेता



महाले यांच्याहस्ते करण्यात येणार आहे. तरी या सोहळ्यात जिल्ह्यातील इच्छूक वधू-वरांनी सहभाग घेण्याचे आवाहन संजीवनी बहु. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष निवृत्ती जाधव यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकसभा निवडणुक निकालावर सिटी न्यूजचा एक्सिट पोल ठरला खरा...

## अनेक पक्ष पदाधिकाऱ्या सोबत सिटी न्यूज स्टुडिओत केली महाचर्चा

वृत्तसंस्था/ अमरावती

अमरावती लोकसभा निवडणुक मतदान प्रक्रिया गेल्या २६ एप्रिल राबविण्यात आली यात याच निवडणुकीची मतमोजणी ४ जून च्या सकाळी ८ वाजता मार्डी मार्गावरील लोकशाही भवन येथे सुरुवात करण्यात आली ,, याच निवडणूक दरम्यान आमच्या सिटी न्यूज स्टुडिओत गेल्या एक आठवड्या पासून अनेक पक्ष पदाधिकाऱ्यांची लोकसभेवर राजकीय समीक्षण वर महाचर्चा करण्यात आली ,, यात माजी खासदार अनंत गुढे काँग्रेस चे मिलिंद चिमोटे किशोर बोरकर , संतोष ठाकरे, प्रवीण मनोहर , शिवसेनेचे सुनील खराटे काँग्रेसचे समीर जवंजाल, भाजपचे सारंग राऊत सह राजकीय समीक्षक म्हणून माधव पांडे परिमल खाबिया यांच्या सोबत आमच्या सिटी न्यूज प्रबंध संपादक डॉ चंदू सोजतिया यांनी महा-चर्चा करून लोकसभेच्या निवडणुकीवर चर्चा केली होती ..


अशातच आमच्या सिटी न्यूज ने लोकसभा निवडणूक निकालावर आपला एक्सिट पोल सुद्धा प्रसारित केला होता, आणि इकडे ४ दिवसाआधी सिटी न्यूज चॅनलचा एक्सिट पोल प्रसारित होणे आणि ४ जूनच्या सायंकाळी लागलेला लोकसभा निवडणुकीचा निकालात साम्य दिसून आल्याने आमच्या सिटी न्यूज चे प्रबंध संपादक डॉ चंदू सोजतिया यांनी तयार केलेला लोकसभा निवडणुक निकालाचा एक्सिट पोल खरा ठरला ,, अमरावती जिल्ह्यातील विधानसभा निहाय एवढंच नाही तर जातीनिहाय नुसार कोणत्या उमेदवारांला किती मते मिळणार कोणता उमेदवार कोणत्या विधानसभा क्षेत्रातून किती मतांनी आघाडी घेणार आणि शेवटी कोणता उमेदवार निवडून येणार याची समीकरणे अखेर सत्य ठरली आमच्या सिटी न्यूज चॅनल च्या एक्सिटपोल नुसार दर्यापूर विधानसभा क्षेत्रात भाजपच्या उमेदवार नवनीत राणा याना ८० हजार १५४ मते तर काँग्रेस चे उमेदवार बळवंत वानखडे याना ८६ हजार १६६ मते तर प्रहार चे दिनेश बुब यांना २० हजार ३९ मते दर्यापूर तालुक्यातून बळवंत वानखडे ६ हजार १२ मतांनी आघाडीवर राहणार असे स्पष्ट केले होते

तिवसा विधानसभा क्षेत्रातून नवनीत राणा याना ६३ हजार ८१३ मते तर बळवंत वानखडे याना ९१ हजार ९६१ मते दिनेश बुब याना १८ हजार २३२ मते मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती, तिवसा मधून नवनीत राणा २७ हजार ३४८ मतांनी आघाडी घेणार असे भाकीत केले होते मेळघाटात नवनीत राणा याना १ लाख २३ हजार १७० मते बळवंत वानखडे याना ६१ हजार ५८५ मते तर दिनेश बुब यांना २० हजार ५२० मते मिळणार यासोबतच मेळघाटातून ६१ हजार ५८५ अँटनी नवनीत राणा आघाडी घेणार

अमरावती विधानसभा क्षेत्रातून नवनीत राणा याना ६९ हजार ७३५ मते बळवंत वानखडे यांना १ लाख ९ हजार ५८३ मते दिनेश बुब यांना १९ हजार ९२४ मते घेऊन अमरावती विधानसभा क्षेत्रातून बळवंत वानखडे ३९ हजार ८४८ मतांनी आघाडीवर राहतील

बडनेरा विधानसभा क्षेत्रात नवनीत राणा याना ७५ हजार ४३२ बळवंत वानखडे याना ८४ हजार ८६१ मते दिनेश बुब याना ९ हजार ४२९ मते मिळणार यात ९ हजार ४२९ मतांनी नवनीत राणा आघाडीवर राहणार असा सिटी न्यूज ने कौल दिला होता ..

सिटी न्यूज च्या एक्सिट पोलनुसार अंतिम निकालात भाजप उमेदवार नवनीत राणा याना ५ लाख ८ हजार ४८३ मते मिळणार तर काँग्रेस उमेदवार बळवंत वानखडे याना ५ लाख ४५ हजार ५६५ मते मिळणार तर दिनेश बुब याना १ लाख ५ हजार ९३ मते मिळणार असून निवडणुकीत बळवंत वानखडे ३७ हजार




८१ मतांनी आघाडी घेणार असल्याचा एक्सिट पोल स्पष्ट केला होता तर अखेर निवडणूक विभागाने केलेल्या मतमोजणी नंतर हाती आलेल्या आकडेवारी वर लक्ष टाकले असता नवनीत राणा याना ५ लाख ६ हजार ५४० काँग्रेस उमेदवार ५ लाख २६ हजार २७१ मते दिनेश बुब याना ८५ हजार ३०० मते मिळाली असून या निवडणूक निकालात बळवंत वानखडे १९ हजार ७३१ मतांनी विजयी ठरले ,, आकडेवारीवर लक्ष टाकले असता आमच्या सिटी न्यूज च्या एक्सिट पोल आणि लागलेल्या निकालावरील आकडेवारी थोडेफार अंतराने साम्य दिसून येत आहे ,, त्यामुळे गेल्या लोकसभा निवडणुकीचा एक्सिट पोल सारखा यावेळेस सुद्धा सिटी न्यूज चॅनल चा एक्सिट पोल खरा ठरला हे स्पष्ट होत आहे ,, याच एक्सिट पोल वर अमरावती करानी आमच्या सिटी न्यूज प्रबंध संपादक डॉ चंदू सोजतिया सह सिटी न्यूज परिवाराचे अभिनंदन केले आहे

# ज्वारीचे कोमटे खाल्याने सहा मेंढरांचा मृत्यू

जनसचंलन/बोरखेड

ज्वारीचे कोमटे खाल्ल्याने सहा मेंढरांचा मृत्यू झाल्याची घटना बोरखेड शिवारात ३ जून रोजी सायंकाळी घडली. संग्रामपूर तालुक्यातील बोरखेड शिवारात उन्हाळी ज्वारीचा पेरा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या परिसरात मेंढपाळ दूरवरून चराई करण्यासाठी आले. चराईसाठी शेतकऱ्यांनी ज्वारी काढून शेत रिकामे केले. या भागात बागायती ज्व-ारीचा जास्त पेरा होता. जमिनीतील ओल कायम राहिल्याने ज्वारीचा धसकटांना हिरवेगार कोंब फुटले.



कोमट्याची वाढ अर्धा फूट झाली होती. हे कोमटे खाल्ल्याने विषबाधा होऊन सहा गर्भधारणा झालेल्या मेंढरांचा मृत्यू झाला. त्यामुळे मेंढपाळांचे ५० हजारांचे नुकसान झाल्याची माहिती चितळवाडी येथील मेंढपाळ तुकाराम खताळांनी दिली.

# दुचाकी फलकावर धडकलेल्या अपघातात एक ठार...

जनसंचलन/मोताळा

भरधाव दुचाकी अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला लावलेल्या फलकावर धडकल्याने एकजण जा-गीच ठार झाला. ही घटना ३ जून रोजी रात्री मोताळा ते नांदुरा मार्गावर घडली. संजय प्रल्हाद खंडाळकर (वय ४६, रा. आडविहीर) असे मृताचे नाव आहे. तालुक्यातील आडविहीर येथील संजय प्रल्हाद खंडाळकर हे काल ३ जून-ला रात्री दहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या एम.एच. २७/ ए.यु. / ५५६५ क्रमांकाच्या दुचाकीने मुलासह मोताळा येथून घरी आडविहीर येथे जात होते. दरम्यान, मोताळा ते नांदूरा मार्गावर एका शाळेसमोर रस्त्याच्या कडेला एका फलकावर त्यांची दुचाकी धडकल्याने चालक संजय खंडाळकर यांचा मृत्यू झाला. तसेच सोबत असलेला त्यांचा मुलगा जखमी झाला आहे तेथे सोलार प्लँटचे काम सुरू आहे. त्यामुळे त्या ठिकाणी सोलार प्लॅट साहित्य घेऊन येणारे अनेक ट्रक आणी मोठ मोठे ट्रेलर ही वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभी असतात त्या ट्रकचे लाईट डोळ्यावर चमकल्याने दुचाकी चालक संजय खंडाळकर यांना समोरचे काहीच दिसले नाही. त्यामुळे त्यांची दुचाकी अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या फलकावर जाऊन धडकली, अशी चर्चा




घटनास्थळी उपस्थित नागरिक करत होते. घटनेची माहिती मिळताच बोराखेडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्रेत ताब्यात घेऊन बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# डॉक्टर व पोलीस सांगून महिलेची काढली छेड...

## दोघांवर विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा



**जनसंचलन/ खामगाव**

पतीघरी नसताना रात्री विवाहितेच्या घरी जाऊन डॉक्टर व पोलीस असल्याची बतावणी करत विवाहितेचा हात धरून ओढाताण करूनच छेड काढली व अश्लिल शिवीगाळ करून पतीचे अपहरण करण्याची आणि हातपाय तोडण्याची धमकी दिली. अशा तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी तोतया डॉक्टर व पोलीसा विरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वय गुन्हे दाखल केले आहेत गुन्हे दाखल करण्याची कारवाई ३० मे रोजी करण्यात आली आहे. याबाबत स्थानिक रेल्वेगेट वामन नगर भागात राहणाऱ्या विवाहितेने खामगाव शहर पोस्टेला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, २७ मे रोजी रात्री ८ वाजता माझे पती घरी नसताना आकाशवासुदेव इंगळे वय ३० राहणार भालेगाव बाजार व नितीन बाबुराव सूर्यवंशी वय ३३ राहणार तांदुळवाडी तालुका खामगाव हे दोघे संगनमत करून घरी आले व त्यांनी मला तुझे पती कुठे आहेत. अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना माझे पती बाहेरगावी गेल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपी आकाश व नितीन यांनी अनुक्रमे डॉक्टर व पोलीस असल्याची खोटी बतावणी करून त्यांनी वाईट उद्देशाने माझा हात पकडून ओढताण करून माझा विनयभंग केला. एवढ्यावरच ते थांबले नाही तर त्यांनी तुझ्या पतीचे एखाद्या दिवशी अपहरण करून त्याला गायब करू असे म्हणत मला व माझ्या पतीला अश्लिल शिवीगाळ केली कुऱ्हाडीने हातपाय तोडण्याची धमकी देत दोघांविरुध्दही अँट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून तुम्हाला खोट्या केसेस मध्ये अटकवू अशी धमकी दिली. आमचे पोलीस अधिकारी चांगल्या ओळखीचे आहेत ते आम्हाला काहीही करणार नाहीत असे म्हणून धमकाविले. आरोपी आकाश इंगळे व नितीन सूर्यवंशी हे दोघेही गुंड व गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचे पीडितेने दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी कलम ३५४अ, २९४, ५०६, ३४ भादविचा गुन्हा दाखल केला आहे.

# सावळा येथील इसमाची विष प्राशन करुन आत्महत्या


**जनसंचलन/बुलढाणा**



येथून जवळ असलेल्या सावळा गावातील रहिवासी संदीप बळीराम जगताप (४५ वर्ष) यांनी खडकी शिवारात निर्जन ठिकाणी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना काल मंगळवार ४ जूनच्या सायंकाळी उघडकीस आली. संदीप जगताप यांचे बुलढाण्यातील मलकापूर रोड येथे धान्याचे दुकान आहे. जगताप हे कामानिमित्त सकाळीच गावातून बाहेर पडायचे तर रात्रीचं घरी पोहचायचे. असा त्यांचा दिनक्रम बनला होता. कामाशिवाय दुसरा विचार कधी त्यांचा मनात आला नाही. सगळ्यांशी मनमिळाऊ माणूस म्हणून जगताप यांची ओळख होती. त्यांच्या मनातील विचारांमध्ये काय संघर्ष चालत होता? हे कुणालाच समजले नाही ! अचानकपणे त्यांनी उचललेले टोकाचे पाऊल समस्त सावळा वासीयांसाठी धक्कादायक ठरले. मृतक संदीप जगताप यांच्या पार्थिवावर सामान्य रुग्णालयातील शवगृहात शवविच्छेदन करण्यात आले असून अंतिमसंस्कारासाठी सावळा येथे नेण्यात आले आहे.

# धुऱ्याच्या वादातून दोन गटात हाणामारी !

**जनसंचलन/ खामगाव**



शेतीच्या धुऱ्याच्या वादातून दोन गटांत हाणामारी झाली. ही घटना खामगाव तालुक्यातील वर्णा येथे बुधवारी घडली. या प्रकरणी पोलिसांनी परस्पर विरोधी तक्रारीवरून गुन्हे दाखल केले आहे. कपिल गोपाल इंगळे यांनी हिवरखेड पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्यामध्ये संजय शालिग्राम इंगळे, भारती संजय इंगळे, शालिग्राम इंगळे, विकी राजू इंगळे, लकी इंगळे, मैनाबाई राजू इंगळे, राजू इंगळे यांच्या शेताचा धुरा जवळजवळ आहे. या धुऱ्यावर कपिल इंगळे यांनी दगड टाकले. या कारणावरून संबंधित सात जणांनी गैरकायद्याची मंडळी जमवून कपिल पाटील आणि त्यांच्या कुटुंबीयांना काठीने मारहाण करून अश्लील शिवीगाळ केली. तसेच जिवे मारण्याच धमकी दिल्याचा आरोप केला. या तक्रारीवरून हिवरखेड पोलिसांनी सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान ३४ वर्षीय भारती संजय इंगळे यांच्या तक्रारीवरूनही दुसऱ्या गटातील कुणाल गोपाल इंगळे, कपिल् गोपाल इंगळे, गोपाल पुंडलिक इंगळे या तिघांविरोधात गैरकायद्याची मंडळ जमवून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी हिवरखेड पोलिसान गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास् हिवरखेड पोलिस करीत आहेत.

# समृद्धीवर डोणगाव नजीक खासगी प्रवासी बस उलटली दोघे गंभीर जखमी

**जनसंचलन/ डोणगाव**



डोणगाव नजीक प्रवासी बस उलटून तिची अशी अवस्था झाली होती.

समृद्धी महामार्गावर मेहकर तालुक्यातील डोणगावनजीक छत्तीसगड येथून पुण्याला जाणारी प्रवाशी बस उलटून झालेल्या अपघातामध्ये दोन प्रवासी जखमी झाले. हा अपघात बुधवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास घडला. सुदैवाने बसमधील ५४ प्रवासी सुरक्षित.आहेत छत्तीसगडमधून पुणे येथे खासगी प्रवाशी बस जात होती. ५ जून रोजी पहाटे समृद्धी महामार्गावर चॅनल क्रमांक १६७ जवळ असलेल्या पेट्रोलपंप नजीक चालकाला डुलकी लागल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला. त्यात बस महामार्गाच्या कडेलाच उलटली. यामध्ये देविदास धुर्वे आणि राज बब्बर हे दोन प्रवाशी जखमी झाले. त्यांना रुग्णवाहिकेद्वारे त्वरित मेहकर येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अपघाताचे वृत्त कळताच डोणगाव पोलिस ठाण्यातील पोलिस कॉन्स्टेबल पवन गाभणे, आनंदा चोपडे, नितीन डुकरे आणि चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. दरम्यान बसमध्ये एकूण ५६ प्रवाशी होते. त्यापैकी दोघेजण जखमी झाले होते.

# घरातील बॅगमधून तीस हजार रुपये चोरट्याने केले लंपास

**जनसंचलन/मोताळा**



घरातील बॅगमधून तीस हजार रुपये लंपास केल्याची घटना राजूर येथे घडली. प्रकरणी ५ जून रोजी बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजूर येथील सेवानिवृत्त दयाराम बापू मेढे यांनी ही तक्रार दिली. गावातीलच सरला अक्षय मेढे यांनी बॅग लंपास केल्याचे तक्रारीत त्यांनी म्हटले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ६० लाख लोकांनी दिली नोटा ला पसंती, तर या राज्यात आघाडीवर...

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

देशात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आला. या निवडणुकीत नोटा म्हणजेच ला अधिक मत दिल्याचे समोर आले आहे. नोटा म्हणजे दिलेल्या उमेदवारांपैकी कोणताही उमेदवार पसंत नसल्यास नोटाचा पर्याय उपलब्ध असतो. या निवडणुकीत भाजप, काँग्रेस यांच्यासोबतच ५३ राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांपैकी ३८ पक्षांना नोटा पेक्षा कमी मते मिळाली. नोटाला जवळपास ६० लाख म्हणजेच ०.९९ टक्के मतं मिळाली.या वरुन हे लक्षात येते की ६० लाख लोकांनी मत देत आपले कर्तव्य पूर्ण केले. पण लोकांनी कोणत्याही पक्षास किंवा उमेदवारास लायक समजले नाही त्यामुळे त्यांनी नोटाचा पर्याय निवडला. ३६ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांत मतदारांनी सर्वात जास्त २.१० टक्के बिहारमध्ये नोटाचे बटन दाबले. लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यात बिहारमध्ये सर्वात कमी मतदान झाले. पूर्ण देशात बिहारमध्ये सर्वात जास्त नोटा या बटनास मतदारांनी पसंती देण्याबाबत तज्ज्ञांचे सांगितले की, बिहारमधील लोक मतदानाबाबत उदास होत चालले आहेत. नागालँडमध्ये नोटाला सर्वात कमी ०.२० टक्के मत लोकांनी दिले.कमी मतदान झालेल्या राज्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहे. पण या दोन राज्यातील लोकांनी नोटाला मत देण्यास पसंती दर्शवली नाही. दोन्ही राज्यात एका टक्क्यांहून कमी नोटाचे बटन दाबण्यात आले. उत्तर प्रदेशमध्ये ०.७१ टक्के आणि महाराष्ट्रात ०.८३ टक्के मत नोटाला दिले. तर देशात पश्चिम बंगाल राज्यात जास्त मतदान झाले. या बाबतीत ते पहिल्या क्रमांकावर आहे. या राज्यांतील मतदारांनी एक टक्क्याहून कमी म्हणजे ०.९० टक्के मत नोटाला दिले. पण हा आकडा उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांपेक्षा अधिक आहे.नोटाला सर्वात जास्त मत देणाऱ्या १० राज्यांत बिहार, दादरा आणि नगर हवेली, गुजरात, मध्य प्रदेश, त्रिपुरा, ओडिसा, असम, गोवा, आंध्र प्रदेश आणि झारखंड यांचा समावेश आहे. ज्यात लोकांनी कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा अपक्ष उमेदवाराला मतदान देण्या योग्य समजले नाही. नोटाला सर्वात कमी मत नागालँड, लक्षद्वीप, हरियाणा, तेलंगणा, पंजाब, दिल्ली, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर आणि उत्तर प्रदेश या दहा राज्यांत झाले. दिल्लीत कमी मतदान जरी झाले असले तरी येथील लोकांनी नोटाला मत देण्यात रस दाखवला नाही.मध्य प्रदेशमधील इंदौर या जागेवर




निवडणुक लढवणारे भाजपचे उमेदवार शंकर लालवानी यांच्या व्यतिरिक्त निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या बाकी १३ उमेदवारांना मिळालेल्या मत नोटापेक्षा कमी होते. या जागेवर भाजपच्या उमेदवाराला १२ लाख २६ हजारांपेक्षा जास्त मत मिळाले तर नोटा २ लाख १८ हजारांपेक्षा अधिक मतांनी दुसऱ्या क्रमांकावर होते. शंकर लालवानी यांच्या व्यतिरिक्त अन्य उमेदवारांस जवळपास १ लाख १६ हजार मते मिळाली, जे की नोटापेक्षा कमी होते.

# जागतिक पर्यावरण दिनाच्या काळातच मेरा अंत्रीखेडेकर कवठळ शिवारात अवैद्य वृक्षतोड

जनसचंलन/ चिखली

तालुक्यातील मौजे मेरा अंत्रीखेडेकर कवठळ शिवारात पर्यावरण दिनाच्या काळातच एक नवे दोन नवे तब्बल चार व्यापारी हे अवैद्य वृक्ष तोड करीत आहे याची भनक सुद्धा वनपाल यांना लागत नाही वनपाल हे या भागात नोकरी करतात की त्यांच्या ऑफिस व घरीच नोकरी करतात हा मोठा प्रश्न या भागातील वृक्षप्रेमी लोकांना पडलेला आहे वनपाल हे या भागांमध्ये कधीही दिसत नसल्यामुळे सदर व्यापारी यांची मजुरी वाढली आहे आणि या तीन गावांमध्ये सुज्ञ नागरिकांच्या असे लक्षात आले आहे की जागतिक पर्यावरण काळामध्येच या भागांमध्ये चार ठिकाणी अवैध्य वृक्ष तोडत असल्याचे वृक्ष वर प्रेम करणाऱ्या लोकांनी या भागाचे वनपाल श्री पठाण यांना दूरध्वनीवरून सांगितले परंतु सर्व लोकांना चार ठिकाणी अवैध्य वृक्ष लागवड करताना दिसले परंतु या भागाच्या वनपाल अधिकारी यांना या भागातील अवैद्य वृक्ष लागवड तोडताना दिसले नाही हे विशेष उल्लेखनीय आहे वनपाल हे या भागांमध्ये येऊनही सुद्धा पाहत नाहीत भरपूर लोकांना या भागाचे वनपाल कोण आहे हे सुद्धा माहित नाही वनपाल हे फक्त कागदपत्रे विजिट करतात असे असल्याचे दिसून येत आहे या भागांमध्ये वन्य प्राणी सुद्धा पिण्याच्या पाण्यासाठी भटकतात काही दिवसापूर्वीच कवठळ या ठिकाणी एक माकड हे विहिरीत पडले होते त्यावेळेस सुद्धा या भागाचे वनपाल व जे अधिकारी ज्या अधिकाऱ्याची यासाठी निवड केली आहे त्यांनी सुद्धा या ठिकाणी येवुन सुद्धा पाहिले नाही त्यांनी एक प्रायव्हेट माणूस पाठवून माकड हे विहिरीतून बाहेर काढले सदर माकडाला हाताला व पायाला बऱ्याच जखमी झाल्या असल्याचे प्रथमदर्शनी स्थानिक लोकांनी सांगितले परंतु त्या ठिकाणी वन विभागाचे कोणतेही कर्मचारी हजर नसल्यामुळे सदर माकडावर कोणत्याही प्रकारचा इलाज न करताच माकड कळपामध्ये सोडून दिले वनविभागाचे कोणतेही कर्मचारी या भागांमध्ये येऊन सुद्धा पाहत नाही आज वन्यप्राणी हे पाण्यासाठी भटकत आहेत परंतु त्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही त्यामुळे काही वन्यप्राणी हे विहिरीमध्ये पडून जखमी होत आहे त्यावर कोणत्याही प्रकारचा वनविभागाचे कर्मचारी इलाज करत नाहीत व येऊन सुद्धा पाहत नाही त्यांच्यामार्फत कोणालातरी थोडेफार पैसे देऊन त्या त्यांची विल्हेवाट लावण्यास सांगतात परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची इलाज करण्यासाठी वन विभागाचे कोणतेच कर्मचारी त्रास घेत नाही वन कर्मचारी फक्त हे कागदपत्रे नोकरी करीत आहेत त्यांना दूरध्वनीवरून सांगितले असता ते उडवडीचे उत्तर देतात वन विभागाचे कर्मचारी फक्त ज्यावेळेस रोयापासूनचे नुकसान होते त्याच कामांमध्ये वनविभागाचे कर्मचारी तत्परता दाखवतात त्यामध्ये सुद्धा त्यांनी स्पेशल मध्ये एजंट लोक नेमले आहेत त्यामध्ये ते अर्ध्या तुम्ही आणि अर्ध्यात आम्ही अशी भूमिका वनविभागाची दिसून आली आहे आज शासन वृक्ष लागवडीसाठी करोडो रुपये खर्च करीत आहेत आणि पर्यावरणाचा जो होणारा रास आहे तो वृक्ष थोडी मुळेच होत आहे याची थोडीशी सुद्धा भनक वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना दिसून येत नाही ते फक्त आपल्या घरून फोनवर सांगतात की या भागांमध्ये वृक्ष वृक्षतोड ही होत नाही सर्व लोकांना वृक्ष तोडताना दिसतात परंतु वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना वृक्षतोड ही दिसत नाही का ज्यांच्यावर त्याची जबाबदारी दिली आहे तेच जर असे मूंग गळून गप्प बसले तर या भागातील जंगल थोड्या दिवसांमध्ये नष्ट होऊन वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही जर हे जंगलतोड अशी सुरू राहिली तर याचा परिणाम माणसावर सुद्धा होणार आहे आज तपमान एवढं वाढला आहे त्याला कारणीभूत फक्त ही जंगल तोड आहे आणि प्राणी आणि वनस्पती जे प्राणी जंगलात राहतात ते आज गावामध्ये वास्तव्यात दिसून येत आहे याचा स्थानिक लोकांवर विपरीत परिणाम होत आहे जंगलतोडीमुळे जमिनीची धूप होऊन वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही सदर वृक्षतोडीची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच व्यापारी हे वृक्षतोड करीत आहे लोकांना सुद्धा वन खात्याचे कोणत्याही प्रकारची दाक राहीला नाही त्यामुळे कोणीही बिगर परमिशन हे झाडे तोडत आहे सदर झाडे तोडीचा माणसावर परिणाम झालेला आहे काही दिवसापूर्वीच माणसाला ऑक्सिजन कमी मिळाल्या मुळे



कोरोना सारख्या महामारीने आपले डोके वर काढले होते त्यावेळेस ऑक्सिजनची गरज किती आहे हे सर्वसामान्य जनतेला कळाले आहे ऑक्सीजन देणे हेच कार्य झाडाच्या पानांमधून होते त्यामुळे वृक्ष तोड जर ही अशी चालू राहिली तर येणाऱ्या काळामध्ये या भागांमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासेल आणि येणारा पाऊस सुद्धा या भागामध्ये पडणार नाही कारण येणारे ढग जर सरळ समोर गैले तर या भागामध्ये पाऊस पडणार नाही आणि हा भाग वाळवंट होण्यास जास्त दिवस लागणार नाहीत तरी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी या विभागाचे वनपाल यांना समज देऊन आपले कर्तव्य काय आहे याची जाण करून द्यावी अशी मागणी सुद्धा या भागातील वृक्षप्रेमी लोक करीत आहे जर हे वृक्षतोड थांबली नाही तर थोड्याच दिवसांमध्ये वृक्षप्रेमी लोक आंदोलनाचा विचार करून सदर वनपाल यांना बडतर्फ करण्याची मागणी सुद्धा वन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा यांच्याकडे करणार असल्याची चर्चा या भागातील लोकांमधून दिसून येत आहे. सदर माहिती वन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा गवस मॅडम यांना दूरध्वनीवरून माहिती दिली असता त्यांनी ताबडतोब मोबाईल टिम यांना माहिती दिली व लवकरच झालेल्या अवैध वृक्षतोडीची चौकशी करण्यात येईल असे दूरध्वनीवरून उपवन संरक्षक फॉरेस्ट अधिकारी बुलढाणा गवस मॅडम यांनी सांगितले आहे